कण्हेर प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांसाठी निधी मंजुरीबाबत..

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः पुनर्व-२०१९/१७१/प्र.क्र.४५/र-८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१/०८/२०१९

वाचा-

१) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.आरपीए २००८/प्र.क्र.५५०/र-१, दि.१.८.२००९
२) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र.आरपीए ०१११/प्र.क्र.१८/र-१, दि.२८.३.२०११
३) वित्त विभाग शा. नि.क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२,दि.१७/०४/२०१५
४) महसूल व वन विभाग शासन निर्णयक्र.अर्थसं-२०१६/३७३/प्र.क्र.५२/र-८, दि.२४/०८/२०१६
५) महसूल व वन विभाग शासन निर्णयक्र.अर्थसं-२०१९/३७३/प्र.क्र.५२/र-८, दि.२६/०३/२०१८
६) शासनप रिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थसंकल्प-३,दि.०१/०४/२०१९.
७) अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांचे पत्र क्र. भीकामं/लेशा/१८९०/ सन २०१९, दि.२२.०३.२०१९.
८) कार्यकारी अभियंता, उजनी कालवा, विभाग क्र.८, सोलापूर यांचे पत्र क्र. उकावि.८/ले.३/ ३३०१/२०१९, दि.१५.०७.२०१९.

प्रस्तावना-

कण्हेर प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांना संदर्भाधीन क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेअंतर्गत पुर्ण झालेल्या/प्रगतीपथावर असलेल्या ६ नागरी सुविधा कामांकरिता सन २०१७-२०१८ व चालू वित्तीय वर्षामध्ये यापुर्वी संदर्भाधिन क्र.५ येथील शासन निर्णयांन्वये निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानूसार प्रकल्पांतर्गत नमूद प्रशासकीय मान्यतेअंतर्गत सद्यस्थितीत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील पुनर्वसित गावठाण मौजे पिराची कुरोली येथे “बसथांबा बांधकाम” करणेकामी प्रगतीपथावरील नागरी सुविधा कामांची देयके अदा करण्यासाठी रु.३.७५ लक्ष रकमेचा निधी मागणी प्रस्ताव सादर केला आहे. .

२. त्यानुसार विचाराधिन नागरी सुविधेस त्यांच्या पुर्णत्वानूसार तसेच झालेल्या कामाच्या प्रगतीनूसार निधी मागणी करण्यात आली असल्याने मागणी प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

शासन निर्णय-

त्यानुसार, कण्हेर प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील पुनर्वसित गावठाण मौजे पिराची कुरोली येथे “बसथांबा बांधकाम” या नागरी सुविधा कामासाठी

रू.३,७५,०००/- निधी सन २०१९-२०या चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास खालील अटीच्या अधीन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. तदनुसार, शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र.२०१३/प्र.क्र.३०/१३/ विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल २०१५ अनुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारांनुसार, कण्हेर प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील गावठाण मौजे पिराची कुरोली येथे “बसथांबा बांधकाम” या नागरी सुविधा कामाचे देयक अदा करण्यासाठी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात BEAMS प्रणालीवर उपलब्ध तरतूदीतून रु.३,७५,०००/- (रुपये तीन लक्ष पंचाहत्तर हजार फक्त) एवढा निधी "मागणीक्रमांक,सी-१०, लेखाशीर्ष ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प (कार्यक्रम), ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत)" या लेखाशीर्षाखाली विभागीय आयुक्त, पुणे यांना खालील अटींच्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१) विभागीय आयुक्त, पुणे यांनी या आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधित अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर यांचेकडे अर्थसंकल्प वितरणप्रणाली BEAMS द्वारे तात्काळ वितरित करावा.

२) अधीक्षक अभियंता, भीमा कालवा मंडळ, सोलापूर यांनी नागरी सुविधा कामांसाठी वितरीत सदरचा निधी विभागीय आयुक्त,पुणे यांचेकडून प्राप्त होताच संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे विनाविलंब वितरित करावा.

३) नागरी सुविधा कामांसाठी शासनाच्या पुनर्वसन विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जात असल्याने नागरी सुविधा कामांची देयके अदा करण्यासाठी संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाकडून कोणतीही परवानगी/मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही.

४) कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभागक्र.८, सोलापूर यांनी या आदेशान्वये मंजूर केलेला निधी प्राप्त होताच नागरी सुविधा कामांची प्रलंबित देयके तात्काळ अदा करावीत तसेच तदनुषंगाने कार्यपूर्ती अहवाल शासन, विभागीय आयुक्त, पुणे व संबंधित जिल्हाधिकारी यांना सत्वर सादर करावा.

५) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला व प्राप्त झालेला निधी मंजूर नागरी सुविधा कामांवरच खर्च करण्यात यावा तसेच सदर निधी खर्च करताना मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त खर्च होणार नाही याची कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

६) मंजूर निधी शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय अन्य कामांवर खर्च होणार नाही याची संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

७) सदरच्या आदेशातील नमूद मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र.सी-१०, ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प(कार्यक्रम), ५३ मोठी बांधकामे

(४७०१-एच-७२७) (दत्तमत) या लेखाशीर्षांतर्गत कोणताही निधी शिल्लक रहाणार नाही अथवा सदर आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational Bank Account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित यंत्रणेचे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

८) सदरच्या आदेशातील नमूद मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र.सी-१०, ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प(कार्यक्रम),, ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत) या लेखाशीर्षांतर्गत एक वर्षापूर्वीचे कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही, याची संबंधित यंत्रणेचे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

९) मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. सी-१०, ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प(कार्यक्रम), ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत) या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

१०) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconciliation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

११) संबंधित अधीक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय,संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/शासनास तातडीने सादर करावे.

१२) यासंदर्भातील लेखाशीर्षाखाली चालू वित्तीय वर्ष सन २०१९-२०२० मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने खर्चाचा विनियोजन लेखा संबधितांनी विहित कालावधीत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११४४०२२७५१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपालयांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: CN = Dayanand S Munjale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2019.08.31 14:47:15 +05'30'

(दयानंद शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन), पुणेविभाग,पुणे

२. उप आयुक्त (पुनर्वसन),पुणे
३. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, सोलापूर
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
६. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक
७. कार्यकारी अभियंता,उजनी कालवा विभाग क्र.८,सोलापूर
८. जिल्हाकोषागारअधिकारी,सोलापूर
९. वित्तविभाग,कार्यासन व्यय-१०, अर्थसंकल्प-३,मंत्रालय,मुंबई-३२.
१०.जलसंपदाविभाग, कार्यासन मोप्र-२,मंत्रालय,मुंबई-३२.
११.नियोजनविभाग,कार्यासन १४७५,मंत्रालय,मुंबई ३२.
१२.महसूलववनविभाग,कार्यासनब-१,मंत्रालय,मुंबई ३२.
१३.महसूलव वन विभाग,पी.ए.सी.कार्यासन, मंत्रालय,मुंबई ३२.
१४.निवडनस्ती कार्यासन र-८,महसूलववन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

***

शासन निर्णय क्र. पुनर्व-२०१९/१७१/प्र.क्र.४५/र-८, दि.३१ /०८/२०१९ सोबतचे विवरणपत्र

कण्हेर प्रकल्पांतर्गत सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील पुर्ण/प्रगतीपथावरील नागरी सुविधा कामांसाठी वितरीत निधीचा तपशील.

अ.क्र	पुनर्वसित गावाचे नाव	नागरी सुविधा काम	वितरीत निधी (रुपये)
१)	पिराची कुरोली	**बस थांबा बांधकाम**	३,७५,०००/-
		एकूण	**३,७५,०००/-**

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: CN = Dayanand S Munjale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forest Department
Date: 2019.08.31 14:47:42 +05'30'

(दयानंद शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन